**ठळक बातम्या**

- देशभरात स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात, समान नागरी कायद्यावर देशभरात व्यापक चर्चेची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त/ बांगलादेशातल्या हिंदू आणि अल्पसंख्यकांविषयी मोदी यांच्याकडून चिंता व्यक्त

- जगभरात अनेक ठिकाणी भारताचा स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा

- पारशी नववर्ष नवरोजनिमित्त पारशी समाजातल्या नागरिकांना राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून शुभेच्छा

**आणि**

- श्रीलंकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ३९ उमेदवार रिंगणात

**<><><><><>**

देशातले १४० कोटी नागरिक एकजुटीने वागले तर, प्रत्येक आव्हानावर मात करत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राचं स्वप्न साकार होऊ शकेल असं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त सलग ११व्यांदा मोदी यांनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावला, त्यानंतर ते देशाला संबोधित करत होते. विकसित भारतात सर्वसामान्यांच्या जगण्यात सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असावा, आणि लोकांना गरज असेल तेव्हाच सरकारनं पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ऐकूया एक वृत्तांत

**होल्ड - कॅप्सूल**

*प्रत्येक धर्माचे वेगवेगळे वैयक्तिक कायदे असल्यावर समाजात फूट पडते, म्हणून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधली दरी कमी होईल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.*

**होल्ड - प्रधानमंत्री**

*देशात वारंवार निवडणुका होत राहिल्या तर, प्रत्येक विकासकामाकडे निवडणुकांच्या अनुषंगानेच पाहिलं जातं, म्हणून एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा असं ते म्हणाले.*
*आपण कोणत्याही राजकीय भावनेतून नाही तर राष्ट्र प्रथम या भावनेतूनच देशात सुधारणा घडवून आणल्या. आजवरच्या प्रयत्नांमुळे देशाचं दरडोई उत्पन्न दुप्पट करण्यात सरकारला यश आल्याचंही ते यावेळी म्हणाले.*

*देशातल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जावं लागू नये यासाठी येत्या पाच वर्षांत वैद्यकीय प्रवेशाच्या ७५ हजार नव्या जागा तयार करण्याची घोषणाही त्यांनी केली.*

*अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्यांनी निकोप स्पर्धा करावी असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी त्यांनी बांग्लादेशातल्या परिस्थितीविषयी आणि तिथल्या हिंदू आणि अल्पसंख्यकांविषयी चिंता व्यक्त केली.*

**होल्ड - बांग्लादेश बाइट (८.०५ साठी)**

*या कार्यक्रमाला देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. भाषणानंतर त्यांनी उपस्थितांनी भेट घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या अमरज्योती शहीद स्मारकावर आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही देशवासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.*

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त अनेक जागतिक पातळीच्या नेत्यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत. मालदीवचे

राष्ट्रपती मोहम्मद मोईज्जू आणि फ्रान्सचे राष्ट्रपती इम्यॅन्युअल मॅक्रॉन यांच्या शुभेच्छांबद्दल मोदी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. लोकहितासाठी एकत्र काम करण्याविषयीचं आवाहन मोदी यांनी यावेळी केलं. यासह इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, संयुक्त अरब अमिरातीचे प्रधानमंत्री मोहम्मद बिन राशिद अल मक्तूम तसंच नेपाळ आणि भूतान या देशांच्या प्रधानमंत्र्यांनी दिलेल्या शुभेच्छांचेही प्रधानमंत्री मोदी यांनी आभार मानले आहेत.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भेट घेतली. यात कांस्य पदक विजेता भारतीय हॉकी संघ, नेमबाज मनू भाकर, स्वप्नील कुसळे, सरबज्योत सिंग, कुस्तीपटू अमन सेहरावत यांचा समावेश होता. नीरज चोप्रा उपचारांसाठी जर्मनी इथं गेल्यामुळे तो या भेटीच्यावेळी अनुपस्थित होता.

**<><><><><>**

राज्यातही सर्वत्र स्वातंत्र्यदिन उत्साहानं साजरा आला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पुण्यातल्या राजभवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. राज्यशासन राज्याचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळायला सुरुवात झाली असून युवकांना रोजगारासाठी प्रशिक्षण, विद्यावेतन, गोरगरीब, दुर्बलांना वर्षातून तीन मोफत गॅस सिलेंडर, शेतकऱ्यांना वीज सवलत, मुलींना संपूर्ण व्यवसायिक शिक्षण मोफत अशा अनेक योजना सुरु केल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जगभरात अनेक ठिकाणी भारताचा स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा झाला. संयुक्त अरब अमिरातीमधल्या भारतीय समुदायानं आज भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला. अबु धाबीमध्ये राजदूत संजय सुधीर यांच्या हस्ते दूतावासात भारतीय ध्वजारोहण झालं. आपल्या भाषणात त्यांनी भारताची उल्लेखनीय प्रगती आणि संयुक्त अरब अमिरातीसोबतचे मजबूत संबंध यावर प्रकाश टाकला.

दुबईतल्या वाणिज्य दूतावासात कॉन्सुल जनरल सतीश कुमार सिवन यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी स्वातंत्र्योत्सव साजरा झाला.

विविध देशांमधले भारतीय दूतावास आणि इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (ICCR) द्वारे जगभरात आयोजित केलेल्या उत्साहवर्धक कार्यक्रमांच्या मालिकेसह भारतानं आपला ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला

जगभरातील सांस्कृतिक संबंध (ICCR). भारतीय वंशाचे लोक आणि जागतिक स्तरावर भारतमित्रांमध्ये देशभक्ती आणि एकतेची भावना या उत्सवांनी प्रतिबिंबित केली.

नेपाळमध्ये, राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी भारतीय समुदायाचे सदस्य, भारताचे मित्र आणि दूतावासाचे अधिकारी त्यांच्या कुटुंबियांसह उपस्थित असलेल्या समारंभात राष्ट्रध्वज फडकावला.या कार्यक्रमात स्वामी विवेकानंद कल्चरल सेंटर आणि केंद्रीय विद्यालय, काठमांडू येथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतं आणि नृत्ये सादर केली

इस्त्रायलमध्ये राजदूत संजीव सिन्हा यांनी तिरंगा फडकावून भारतीय समुदायाला शुभेच्छा दिल्या.

नेदरलँड्समध्ये, गांधी केंद्रानं भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील कलेच्या भूमिकेच्या महत्त्वावर भर देऊन स्वातंत्र्यदिन साजरा केला.

भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त न्यूयॉर्क शहरात दरवर्षी होणाऱ्या विशेष संचलनामध्ये विविधतेतील एकतेचं प्रतीक असलेले आणि भारतातल्या विविध धर्मांचं प्रतिनिधित्व करणारे चार चित्ररथ प्रदर्शित केले जाणार आहेत अशी माहिती आयोजकांनी दिली आहे. येत्या रविवारी होणाऱ्या ४२व्या संचलनाच्या निमित्तानं एम्पायर स्टेट बिल्डिंग रात्री तिरंग्यानं उजळून निघणार आहे.

**<><><><><>**

देशभरात आज नवरोज उत्साहात साजरा केला जात आहे. पारशी बांधवानी अग्यारीत जाऊन या निमित्त प्रार्थना केली आणि सर्वांना शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज पारशी नववर्ष, नवरोजनिमित्त सर्व नागरिकांना, विशेषत: पारशी समाजातल्या लोकांना शुभेच्छा दिल्या आहेत. नवरोज हे आनंद, उत्साह आणि विश्वासाचं प्रतीक असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. पारशी समाजानं आपल्या परिश्रमातून देशाच्या विकासात मोठं योगदान दिलं आहे असं राष्ट्रपतींनी सांगितलं,

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही याप्रसंगी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा नवरोज भरपूर आनंद, यश आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो, अशी इच्छा मोदी यांनी समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये व्यक्त केली. देशातले बंधुभावाचे बंध अधिक दृढ व्हावेत, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

बंदी घालण्यात आलेल्या उल्फा या अतिरेकी संघटनेनं २४ ठिकाणी बॉम्ब ठेवल्याची धमकी दिल्यानंतर आसाममध्ये सुरक्षा दलांनी विविध ठिकाणी शोध मोहिम राबवली. राज्यातून कुठल्याही अनुचित प्रकाराची नोंद नाही. गुवाहाटीमध्ये काही ठिकाणी संशयास्पद वस्तू आढळल्या असून न्याय वैद्यक चाचणीसाठी त्या

पाठवल्याची माहिती पोलीस महासंचालक जी. पी. सिंग यांनी दिली. चर्चेतून मुद्दे सोडण्याचं आवाहन मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांनी उल्फाला केलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेतल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी ३९ उमेदवार रिंगणात आहे. २१ सप्टेंबर रोजी ही निवडणूक होणार आहे. आर्थिक संकटानंतर श्रीलंकेत पहिल्यांदाच अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. विद्यमान अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा आणि मार्क्सवादी नेते अनुरा दिस्सानायके यात प्रमुख उमेदवार आहेत.

**<><><><><>**

ओडिशामध्ये नोकरदार महिलांना मासिक पाळीच्या काळात एक दिवस रजा देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री प्रवती परिदा यांनी आज जाहीर केला. सरकारी आणि खासगी नोकरीत असणाऱ्या महिलांना ही रजा मिळणार आहे. बिहार आणि केरळ या राज्यांमध्ये अनुक्रमे दोन आणि तीन दिवसांची सुट्टी देण्यात येते.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये कोलकात्यातल्या R. G. कार वैद्यकीय महाविद्यालयात काही व्यक्तींनी काल रात्री तोडफोड केली. याप्रकरणी पोलिसांनी ९ जणांना अटक केली असून २६ जणांची ओळख पटली आहे. महिला डॉक्टरच्या अत्याचार आणि खून प्रकरणी सीबीआयचं पथक आज या ठिकाणी पोहोचलं. दुसरं पथक महिलेच्या घरी गेलं आहे.

**//<><><><><>//**